कृषिसल्ला

# काकडीची लागवड ठरेल लाभदायी

प्रा. पल्लवी घुले
प्रा. भिमराव मोरे
(फळशास्त्र विभाग)
प्रा. संदीप विधाते
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक





काकडी पिकाची लागवड वर्षाच्या जून किंवा जुलै आणि जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यांत करणे महत्त्वाचे असते. लागवड करण्याआधी शेताची चांगली मशागत करून योग्य प्रमाणात शेणखताचा पुरवठा करावा. जर माती परीक्षण केलेले असेल तर उत्तम. ५० किलो पालाश ५० किलो स्फुरद या रासायनिक खतांचा पुरवठा योग्य प्रमाणात करावा. नत्राचा पुरवठा एकाच वेळेस न करता दोन टप्प्यात विभागून द्यावा. रासायनिक खतांचा पुरवठा खुरपणी झाल्यानंतर साधारणतः ३ आठवड्यांनी पहिला डोस व ६ हप्त्यानंतर २ रा डोस द्यावा.

काकडी या पिकाचे योग्य नियोजन करून जर उत्पादन घेतले तर शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकते. महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील पाचोरा जामनेर, यावल, पारोळा व नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात काकडीचे अधिक प्रमाणात उत्पन्न घेतले जाते. काकडीला उन्हाळ्यात जास्त प्रमाणात मागणी असते. जर शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात योग्य नियोजन करून चांगले उत्पादन घेतले तर शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होऊ शकतो.

**काकडी लागवडीचा कालावधी :** काकडी पिकाची लागवड वर्षाच्या जून किंवा जुलै आणि जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यांत करणे महत्त्वाचे असते. लागवड करण्याआधी शेताची चांगली मशागत करून योग्य प्रमाणात शेणखताचा पुरवठा करावा. जर माती परीक्षण केलेले असेल तर उत्तम. ५० किलो पालाश ५० किलो स्फुरद या रासायनिक खतांचा पुरवठा योग्य प्रमाणात करावा. नत्राचा पुरवठा एकाच वेळेस न करता दोन टप्प्यात विभागून द्यावा. रासायनिक खतांचा पुरवठा खुरपणी झाल्यानंतर साधारणतः ३ आठवड्यांनी पहिला डोस व ६ हप्त्यानंतर २ रा डोस द्यावा.

**जमीन व हवामान :** काकडी पिकाच्या लागवडीसाठी मध्यम किंवा रेताड जमीन जास्त प्रमाणात उपयोगी आहे. जास्त खोल व निचरा होणाऱ्या जमिनीतही लावणी करता येते. काकडी पिकाच्या उत्पादनात हवामान या घटकाचा फार प्रमाणात प्रभाव पडतो. साधारणपणे काकडी पिकास उष्ण हवामान लाभदायी असते. लागवडीच्या वेळी ११ अंश सेल्सिअसपेक्षा तापमान कमी नसावे जर तापमान यापेक्षा कमी असेल तर पिकाच्या उगवण शक्तीवर त्याचा परिणाम होतो. काकडी पिकाच्या वाढीसाठी कमीत कमी १८ ते जास्तीत जास्त २४ अंश सेल्सिअस तापमान योग्य असते.

**लागवड पद्धत :** काकडी पिकाची लागवड सरी- वरंबा पद्धतीने केलेली चांगले असते. ३ फुटाची सरी पाडावी व





त्यात ९० सें.मी. अंतरावर टोकन पद्धतीने लावणी करावी.

**पाण्याचे प्रमाण :** जमिनीचा मगदूर पाहून व इतर वेळेस गरज ओळखून पाण्याचा योग्य तो पुरवठा करावा. काकडी पिकास पाण्याचा ताण पडू देऊ नये. शक्यतो फुलधारणेच्या वेळी पाणी योग्य प्रमाणात देणे फार महत्त्वाचे आहे. पाण्याचा ताण देऊन एकदम जास्त प्रमाणात पाणी दिल्यास फळांना तडे पडू शकतात. काकडीत मादी फुलांची वाढ होणे उत्पादन वाढीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. त्याकरिता जिब्रेलिक ॲसिड १०-२५ पीपीएम किंवा बोरॉन ३ पीपीएमच्या फवारण्या पीक २-४ पानांवर असताना कराव्या. त्यामुळे मादी फुलांची वाढ होण्यास मदत होते. अन्नद्रव्यांची कमतरता किंवा प्रमाणातील अधिकता काकडीच्या उत्पादन वाढीसाठी योग्य नाही.

**काकडीवरील रोग :** फळकूज आणि खोडकूज हा काकडी पिकावरील मुख्य रोग आहे. त्यासाठी मॅन्कोझेब किंवा क्लोरोथॅलॉनॉल २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पांढऱ्या बुरशीसाठी मॅटॅलक्सिल किंवा मॅन्कोझेब २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पांढरी माशी, मावा, तुडतुडे यांसारख्या रसशोषक किडींचा प्रतिबंध करणे फार महत्त्वाचे असते. त्यासाठी इमोडाक्लोप्रिड (कॉन्फिडोर) किंवा उलाला या कीटकनाशकांची फवारणी प्रति १५ लिटर पाण्यात ८ ते १० मि.लि. या प्रमाणात करावी जर एकात्मिक कीड व्यवस्थापन केले तर फायद्याचेच ठरते. फळांची तोडणी शक्यतो काकडी निघायला चालू झाल्यानंतर २ ते ३ दिवसांनी करावी कारण कोवळ्या फळांना बाजारात चांगली मागणी असते, पर्यायाने चांगला भाव मिळून अधिकचे उत्पन्न मिळते.